# वसई विरार शहर महानगरपालिका

## जाहिर आवाहन

महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९, कलम ३७६ (प्रकरण १८) नुसार वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील सर्व व्यवसायधारकांनी महानगरपालिकेचा व्यवसाय परवाना फी भरुन व्यवसाय परवाना (Trade Licence) घेणे बंधनकारक आहे. तसेच दरवर्षी सदर व्यवसाय परवाना फी भरुन त्यांचे नुतनीकरण करुन घेणे आवश्यक आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात जे व्यवसायिक महापालिकेचा कायदेशिर परवाना न घेता व्यवसाय करीत आहेत अशा व्यवसायिकांविरुध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३७६,३७६(अ) अंतर्गत नोटीस बजाविण्याची कार्यवाही परवाना विभागामार्फत करण्यात येत आहे. त्यानंतरही नोटीसीच्या विहित मुदतीत व्यवसायिकांनी वसई-विरार शहर महानगरपालिकेचा परवाना न घेता व्यवसाय सुरु ठेवल्यास अशा व्यवसायांच्या जागा मोहोरबंद (सील) करुन पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-
आयुक्त
वसई-विरार महानगरपालिका